रजि नं. एफ/२०५९ दि. १२ डिसेंबर १९८८


सोलापूर महानगरपालिका

# पेन्शनर संघटना, सोलापूर

अध्यक्ष - श्री. पवार अनंत राजाराम उर्फ माऊली पवार

• हुतात्मा शॉपींग सेंटर, गाळा क्र. २८, रेल्वे लाईन्स, सोलापूर - ४१३ ००१. • मो. ९८२२०७४७०४


जावक क्र. २८

दिनांक : ३ /११ /२०२३

## नम्र निवेदन

**प्रति,**

**मा.आयुक्त सो,**
सोलापूर महानगरपालिका,सोलापूर.
यांचेकडे सादर..

**विषय:- हयात दाखले सादर करणेबाबत...**

संदर्भ:- आपलेकडील जाहिर प्रसिध्दीकरण जा.क्र.मुले6/पे/1496 दि.31/10/ 2023

**महोदय,**

हयात दाखले दि.20/11/2023 पर्यंत ज्या त्या बँकेत जावून समक्ष स्वाक्षरी करणेबाबत जाहिर प्रसिध्दीकरण आपले कार्यालयातर्फे करण्या आलेले आहे. मात्र यामध्ये अति ज्येष्ठ सेवानिवृत्त ज्यांनी **वय 75 वर्षे** ओलांडलेली आहे. ते बँकेत जावून स्वाक्षरी किंवा अंगठा करु शकत नाही. तसेच जे सेवानिवृत्त कर्मचारी परगावी स्थाईक झालेली आहे व ज्यांना प्रवास करणे झेपत नाही अशा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी कोणतीही सोय केलेले दिसून येत नाही.

त्यामुळे अशा सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी **"ऑनलाईन सुविधा"** देणे अत्यंत गरजेचे आहे. बँका असे सांगतात की, सोलापूर महानगरपालिकेने आम्हाला तसे कळविल्यास आम्ही **"ऑनलाईन सुविधा"** उपलब्ध करुन देवू शकतो. तरी सोलापूर महानगरपालिकेने तसे संबंधीत **बँकेस कळविणे** आवश्यक आहे किंवा कळवावे.

शिवाय दिवाळी सणानिमित्त सार्वजनिक सुट्टया अन्य कारणाने अशा एकूण सुमारे 9 ते 11 येत आहेत. म्हणजे हयातीचे दाखले देणेकामी **फारच कमी** दिवसाचे मुदत दिलेली असल्याचे दिसून येते. यात सर्वबाबींचा विचार करुन त्वरीत हयातीचे दाखले ऑनलाईन सेवाद्वारे देणेबाबत आपले स्तरावरुन आदेश प्रसारीत करण्यात यावे ही नम्र विनंती.

याशिवाय सध्या संपूर्ण महाराष्ट्रामध्ये **"मराठा आरक्षण"** या सारखे ज्वलंत प्रश्न उपस्थितीत झालेले आहे. परिणामी सर्वत्र वाहतूक व्यवस्था बहुतांशी ठप्प झालेली आहे. याचाही विचार होणेस विनंती आहे.

मा. उपायुक्त कार्यालय आवक क्र. दि. सोलापूर महानगरपालिका

**आपला विश्वासू**

**(अध्यक्ष /सेक्रेटरी)**

**प्रत:-**

1) **मा.अतिरिक्त आयुक्त सो.**
2) **मा.उपआयुक्त सो.** - २
3) **मा.मुख्य लेखापाल सो.**
4) **स्थळप्रत.**

camp. dept.

आवक क्र. 9980
दि. ०८/११/23
उपायुक्त-२

आवक .क्रं. 1120 दि. 08/11/२०२3
संगणक विभाग